महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन आदेश क्रमांक : संकीर्ण-२०१६/सं.क्र.२३५८/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २ जून, २०१८.

विषय : विद्युत अधिनियम २००३ चे कलम ६८ नुसार ११ के.व्ही. वाहिनी उभारण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ - १. मे.जीएमआर वरोरा एनर्जी लि., वरोरा जि.चंद्रपूर यांचे दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ चे पत्र.
२. महावितरण कंपनीचे पत्र क्र. CE(Dist)/D-III/GMR Housing/४११२ दि.२६.०२.२०१८.

आदेश

मला उपरोक्त विषयाशी संबंधित संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने असे कळविण्याचे आदेश आहेत की, मे. जीएमआर वरोरा एनर्जी लि. या कंपनीस वरोरा, जिल्हा चंद्रपूर येथील २X३०० मे.वॅ. क्षमतेच्या औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पापासून सात कि.मी. अंतरावर असणाऱ्या माजरा, ता.वरोरा येथील सदर कंपनीच्या निवासी संकुलास वीज पुरवठा करण्याकरिता ११ के.व्ही. उपरी विद्युत वाहिनी उभारण्यास विद्युत अधिनियम, २००३ चे कलम ६८ नुसार पुढे नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. सदरहू विद्युत वाहिनी केंद्रीय विद्युत प्राधिकरण (विद्युत पुरवठा व सुरक्षा संबंधी उपाय) विनियम, २०१० मधील तरतुदीनूसार उभारणे बंधनकारक राहील.
२. सदरहू विद्युत वाहिनीची उभारणी कंपनीने स्वखर्चाने, महावितरण कंपनीच्या वाहिनी उभारण्याबाबत विहित केलेल्या प्रमाणित पध्दतीने आणि तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली करावी.
३. सदरहू विद्युत वाहिनीचे संचलन व सुव्यवस्था कंपनीने स्वखर्चाने करावी.
४. सदरच्या विद्युत वाहिनीचा वापर ज्या प्रयोजनार्थ करावयाचा आहे (Power For Residential Township) केवळ त्याच प्रयोजनासाठी करणे बंधनकारक असेल.
५. सदरहू विद्युत वाहिनी कार्यान्वित करण्यापूर्वी / प्रभारीत करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याकडून (विद्युत निरीक्षक) पूर्व परवानगी घेण्यात यावी.
६. सदरहू विद्युत वाहिनी उभारतांना व उभारल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांच्या / संबंधित जागा मालकाच्या काही तक्रारी असल्यास त्या तक्रारीचे योग्यरित्या निराकरण करणे, ही जबाबदारी सर्वस्वी कंपनीची असेल.
७. सदरहू वाहिनी उभारताना अगर उभारल्यानंतर महावितरण कंपनीच्या मालमत्तेस हानी पोहोचल्यास त्याची नुकसान भरपाई सदर कंपनीने महावितरण कंपनीस तात्काळ करावी.

८. सदर परवान्याचा कालावधी पत्र दिल्यापासून २५ वर्षाचा असेल, तद्नंतर सदर परवानगी आपोआप संपुष्टात येईल.

९. महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ व महाराष्ट्र वीजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय शुल्क व कर शासनाकडे भरणा करणे बंधनकारक राहील.

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०२११४३२६२६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.06.02 11:44:30 +05'30'

(भि. य. मंता)
शासनाचे उपसचिव

प्रति

उपाध्यक्ष, मे. जीएमआर वरोरा एनर्जी लि.,प्लॉट क्र.बी-१/बी-२, मोहबाला एमआयडीसी ग्रोथ सेंटर, वरोरा, जिल्हा चंद्रपूर ४४२ ९०७.

प्रत,

१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
२. मुख्य विद्युत निरीक्षक, नविन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला,रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,चेंबूर, मुंबई-७१
३. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.